# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** आनसिंग
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0026 **Year (वर्ष):** 2023
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/02/2023 02:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** गुरूवार
      **Time Period (कालावधी):** पहर 6
      **Date From (दिनांक पासून):** 02/02/2023
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/02/2023
      **Time From (वेळेपासून):** 17:18 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 17:45 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 03/02/2023 **Time (वेळ):** 01:44 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 002
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/02/2023 01:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पश्चिम, 20 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** ग्राम सुकळी ,वाशिम

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
फिर्याद

पो.स्टे.अनसिंग
दिनांकः-03.02.2023

माझे नांव - श्री.परमेश्वर पंढरी पवार, वय-37 वर्ष, व्यवसाय-शेती रा.सुकळी ता.जि.वाशिम,
मो.नं.9325200306,

मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहतो व माझे कडे 4 एकर शेती असुन शेती करतो. माझे शिक्षण दुसरी पास आहे. मला लिहीता वाचता येत नाही. दिनांक 01.02.2023 रोजी मी अॅन्टी करप्षन ब्युरो कार्यालय वाशिम येथे गेलो असता तेथे मला पोलीस उपअधिक्षक श्री गजानन शेळके भेटले त्यांचेकडे माझी लाच मागणी बाबत तक्रार सांगितली.पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी पत्र देवुन शासकिय कर्मचारी पंच म्हणुन बोलावुन घेतले. व्यवस्थित लिहीता वाचता येत नसल्याने माझी तक्रार मी सांगितल्याप्रमाणे पंच क्र.1 राजेश्वर मोहन गायकवाड यांनी त्यांचे हस्ताक्षरात मी सांगीतल्याप्रमाणे लिहीली. ती पुढील प्रमाणे
" दिनांक 30.01.2023 रोजी माझी पत्नी व दिलीप सुभाष पवार यांची पत्नी यांचे मध्ये जुन्या वादावरुन भांडन सुरु असतांना मी त्याठीकाणी गेलो.तेथे दिलीप सुभाष पवार रा.सुकळी हा सुदधा हजर होता. त्याठिकाणी आमचे दोघामध्ये बोलचाल,शिवीगाळ झाली.त्यानंतर दिलीप सुभाष पवार व त्यांची पत्नी यांनी पोलीस स्टेशन अनसिंग ला माझे व माझे पत्नी विरुदध रिपोर्ट दिला.त्यानंतर मी व माझी पत्नीने पोलीस स्टेशन अनसिंगला जाउन दिलीप सुभाष पवार व त्यांची पत्नी विरुध्द रिपोर्ट दिला होता.मी आमचे पोलीस चौकी उकळीपेनचे जमादार विनोद चित्तकवार यांना भेटलो असता त्यांनी मला सांगीतले की तुमचे विरुध्द कारवाई केली आहे. तुम्ही सर्व मानसं कोर्टावर जाऊन जमानती करुन घ्या असे सांगीतले. त्यानंतर आमचे गावचे पोलीस पाटील तुळशीदास काशीराम लोखंडे हे मला येवुन भेटले व त्यांनी मला तुझ्या विरुध्द दाखल झालेल्या रिपोर्टमध्ये मोठी कारवाई होवु देत नाही तसेच तुला अटक होवु देत नाही. सदर मॅटर हे तुमच्या दोघात आपआपसात करुन देतो. पण त्यासाठी मला 25000/- रु दयावे लागतील असे सांगीतले.त्यानंतर मी पोलीस पाटील लोखंडे यांना येवढे पैसे जास्त होतात असे म्हटले असता पोलीस पाटील लोखंडे यांनी मला ठिक आहे 15000/- रुपये मध्ये करुन टाकु असे सांगीतले. मी मोलमजुरी करुन शेती करनारा असल्याने तसेच कोर्टकचेरीच्या भानगडीत मला पडायचे नसल्याने मी पोलीस पाटील यांना 15000/- रुपये नाईलाजास्तव देण्याचे कबुल केले आहे. पोलीस स्टेशन येथे दाखल रिपोर्ट मागे घ्यायचा अधिकार पोलीस पाटील यांना नाही हे मला माहिती आहे. तसेच रिपोर्ट मागे घेण्याकरीता कुठलेही पैसे लागत नाही हेही मला माहित आहे. पोलीस पाटील तुळशीराम काशीराम लोखंडे ग्राम सुकळी हे आपले पोलीस पाटील पदाचा प्रभाव टाकुन त्यांनी मला पोलीस जमादार विनोद चित्तकवार यांचे करीता 15000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याने त्यांच्यावर कारवाई करावी या करीता तक्रार देत आहे."
पोउपअधि.श्री गजानन शेळके यांनी मला पडताळणी कार्यवाही बाबत, तसेच मेमरी कार्ड व व्हाईस रेकॉर्डर चे कार्यप्रणाली बाबत समजावून सांगितले. मी पोलीस उपअधिक्षक शेळके, पंच व स्टाफसह मोटार सायकलने राजगांव बॅरेज येथे गेलो. तेथुन मला, पंच क्र.1 सह पोलीस पाटील तुळशीराम काशीराम लोखंडे यांचे भेटीकरीता व्हाईस रेकॉर्डर लावुन सुकळी येथे पोलीस पाटील लोखंडे यांचे घरी पाठवून पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये आमच्या भेटी दरम्यानचे संभाषण रेकार्ड झाले आहे.
भेटी दरम्यान पोलीस पाटील लोखंडे यांनी मला म्हटले की "काय म्हणतं"मी पोलीस पाटील लोखंडे यांना"किती बोलले होते आपल्याले"असे म्हटले.पोलीस पाटील लोखंडे यांनी मला"पंधरा पंधरा एकालं पाहिजे ...म्हणलं" असे म्हटले. मी त्यांना पंधरा हजार एका एकालंअसे म्हटले.त्यांनी मला हो म्हणुन म्हटले.मी पोलीस पाटील यांना माह

तितकं त बजट नाही बसंल असे म्हटले असता त्यांनी मला उदयालोक होत नाही का काहीअसे म्हटले. मी त्यांना इकडंत या....हं ते पुढचं मंग आमच्यावर काही कारवाई होणार तं नाही नं असे म्हटले.पोलीस पाटील यांनी मला कारवाई नाही होतया या याच्यातलं काही भानगडी काही होणार नाही..असे म्हटले. मी त्यांना बर मग ते पंधरा हजारातले आता काही कमी करणार नाही असे म्हटले असता

पोलीस पाटील यांनी मला आता नाही रे ते पंधरा हजार म्या कमी केले पैसै, पन विस हजाराच्या कमी नाही म्हणे तेअसे म्हटले.मी त्यांना बरं तेरा गिरा पर्यंतअसे म्हटले असता त्यांनी पोलीस पाटील यांनी मला पंधरा हजाराचं कर असे म्हटले. मी पोलीस पाटील यांनाते आता तुमच्याकडं हाये पाटील काय करायचं काय नाहीअसे म्हटले असता पोलीस पाटील लोखंडे यांनी मला उदया आपण संगच जाउ मी तुले आपलं अंधारातलं काम नसते...आणखीन तुले सांगतो जे पंधरा हजार हायेत नं माहयाजवळ नाही देले मी साहेबाले बोलावतो वाटल्यास अं त्या सचीन गीचीन ले त्याहयच्या जवळ देले तं चालते आपल आपलं लय सरकं काम हे परमेश्वर असे म्हटले. . पोलीस पाटील लोखंडे यांनी माझे विरुध्द दिलेल्या रिपोर्ट मध्ये कारवाई न करु देण्याकरीता व आपसात मिटविण्याकरीता मला 15000/- लाचेची मागणी करुन उदया पैसे देण्याचे सांगीतले आहे. तसेच पैसे माझेच हाताने त्यांचे समोर विनोद पोलीस जमदार यांना दण्याचे सांगीतले. त्यांनतर मी त्यांना बर म्हणुन तेथुन चालत निघुन काही अंतरावर येऊन पंच क्र.1 यांचे सोबत मोटार सायकलवर बसुन राजगांव बॅरेज येथे परत आलो. पोलीस पाटील लोखंडे यांनी 15,000/-रु रक्कम देण्याचे संगीतले. परंतु गै.अ.पोलीस पाटील लोखंडे यांनी विनोद पोलीस जमादार यांना भेटून माझे समोर पैसे त्यांचे जवळ देण्याचे सांगीतल्याने पोलीस जमादार यांची दि.02.02.2023 रोजी पडताळणी करण्याचे पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी सांगीतले.
दिनांक 02/02/2023 रोजी उकळीपेन येथील पोलीस जमादार विनोद चित्तकवार यांची लाच मागणी संबधाने पडताळणी करावयाची असल्याने पोलीस उपअधिक्षक शेळके, पंच व स्टाफसह मोटार सायकलने राजगांव बॅरेज येथे ठरल्याप्रमाणे आले. तिथे पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी पडताळणी पुर्व पंचनाम्यातील सुचनांची उजळणी करुन देवून माझे जवळ व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देऊन पोलीस चैकी उकळीपेनचे पोलीस जमादार चिनोद चित्तकवार यांना भेटण्यासाठी मला व पंच क्र.1 असे रवाना झालो असता पोलीस चौकी बंद असल्यामुळे पोलीस अंमलदार यांची भेट झाली नाही. त्यामुळे त्यांचे सोबत कुठलेही संभाषण झाले नाही. तसेच पोलीस जमादार विनोद चित्तकवार माझे सोबत फोनवर काहीही बोलत नसल्यामुळे मी त्यांना मोबाईल फोनव्दारे संपर्क केला नाही. त्यामुळे मी पंच क्र.1 यांचे सोबत मोटार सायकलवर बसुन ठरल्याप्रमाणे आम्ही राजगांव बॅरेज येथे परत आलो.पोलीस पाटील लोखंडे यांनी आजच दुपारी 3.00 वाजेपावेतो 15,000/-रु देण्याचे सांगीतले आहे.नाहीतर ते माझे कडुन पैसे घेणार नाहीत तसेच पोलीस जमादार हे प्रत्यक्ष भेटीत माझे सोबत पैश्या बाबत बोलणार नाही याची मला खात्री असल्याने सर्वानुमते दुपारी 03.00 वा सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरले.तेथुन आम्ही सर्व ला.प्र.वि.कार्यालय वाशिम येथे परत आलो.
श्री.शेळके साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे मी पोलीस पाटील लोखंडे यांना लाच म्हणुन देण्याकरीता 15,000/-रूपये रक्कम हजर केली. नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. शेळके साहेब यांनी सापळा कार्यवाही संबंधी सुचना दिल्या. अँल्ट्राव्हायोलेट लॅम्पचा प्रयोग करून दाखविले. त्यांनतर मी पोलीस उपअधिक्षक शेळके, पंच व स्टाफसह असे खाजगी वाहन व मोटार सायकलने राजगांव बॅरेज येथे आलो. तिथे आल्यावर पोलीस पाटील लोखंडे यांना त्यांचे मोबाईल फोनवर संपर्क केला असता त्यांनी ते शेळ्या घेवुन माळरानावर आहे. पाच-साडेपाच पर्यंत घरी सुकळी येथे येतो असे सांगीतले. त्यामुळे आम्ही तिथेच थांबुन राहीलो. काही वेळाने अंदाजे 5 वा दरम्यान मला, पंचासह पोलीस पाटील लोखंडे यांचे भेटीकरीता सुकळी येथे पाठवून पोलीस पाटील लोखंडे यांचे घरी सुकळी येथे सापळा कारवाई आयोजीत करण्यात आली. दरम्यान मी पोलीस पाटील लोखंडे यांना आता हे तुमच्या पाशी देतो असे म्हटले. पोलीस पाटील लोखंडे यांनी मला हा असे म्हटले असता, मी पोलीस पाटील लोखंडे यांना अन मंग उदया नाहीतं पायटंच आपण तिथं जाउ माहा अस म्हणन होत आता मलं कुठ टाईम हाये मलं कुठ जायचं मी फोन करु लागलो नाही का तुम्हालं असे म्हटले. त्यावर पोलीस पाटील लोखंडे यांनी मला साहेबालं बोल असे म्हटले. त्यामुळे पोलीस पाटील यांचे त्यांचे भावाचे मोबाईल फोनवरुन उकळीपेन चे पोलीस जमादार विनोद चित्तकवार यांना फोन लावुन मोबाईल फोन स्पिकरवर टाकला. पोलीस पाटील लोखंडे हे पोलीस जमादार चित्तकवार साहेब यांना बर ते परमेश्वर काय म्हणते आता लय उशीर झाला म्हणते तुमच्या जवळ पैसे देतो म्हणते पायटी जाउ म्हणते.... बोला एकदा त्याहले असे म्हटले.

मी पोलीस जमादार चित्तकवार यांना अं पाटील पाशी जमा कराव का मग असे म्हटले असता पोलीस जमादार

चित्तकवार यांनी मला बर असे म्हटले. मी पुन्हा पोलीस जमादार चित्तकवार यांना हव... हॅलो देउन टाकु का असे पुन्हा विचारले असता पोलीस जमादार चित्तकवार यांनी मला हो असे म्हटले. पोलीस पाटील लोखंडे यांनी पोलीस जमादार चित्तकवार यांना सकाळी येतो आठ नउ वाजता असे म्हटले असता पोलीस जमादार चित्तकवार यांनी पोलीस पाटील लोखंडे यांना मले फोन करुन निघजा असे म्हणले. त्यांनतर पोलीस पाटील लोखंडे यांना पोलीस जमादार चित्तकवार यांचे सांगणेवरुन 15,000/-रु लाचेची रक्कम खिशातुन काढून पोलीस पाटील लोखंडे यांचे समोर धरली असता पोलीस पाटील लोखंड यांनी माझे जवळुन 15,000/-रु लाचेची रक्कम डाव्या हाताने स्विकारली.

पोलीस स्टेशन अनसिंग येथे माझे विरुध्द दिलेल्या रिपोर्ट वर कारवाई न करण्याकरीता व रिपोर्ट आपसात करण्याकरीता दि.01.02.2023 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान तुळशीराम काशीराम लोखंडे वय 43 वर्ष पोलीस पाटील सुकळी,रा.सुकळी यांनी मला 15,000/-रु लाचेची मागणी करुन दिनांक 02.02.2023 रोजी 17.18 ते 17.45 वा दरम्यान सुकळी येथे सापळा कारवाई दरम्यान मोबाईल फोनवर झालेल्या संभाशना मध्ये पोलीस नाईक विनोद दत्तात्राय चित्तकवार पो.स्टे.अनसिंग रा.पार्डी टकमोर ता.जि.वाषिम यांनी पोलीस पाटील तुळशीराम लोखडे यांचे लाच मागणी ला सहमती देवुन लाचेची रक्कम पोलीस पाटील लोखंडे यांचे जवळ देण्याचे सांगीतल्याने पोलीस पाटील तुळशीराम लोखंडे यांनी त्यांचे राहते घरी सुकळी येथे माझे कडून 15000/-रु लाचेची रक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद पो.हवा.विनोद मारकंडे यांनी टंकलिखीत केली असुन मला वाचुन दाखविली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष
(गजानन आर शेळके)

सही

(परमेष्वर

पंढरी पवार
पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.

रा.सुकळी ता.वाशिम, जि.वाशिम

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
SHIVAJI Hanumantrao MASKE
**Rank (पद):** Asst. SI (Assistant Sub-Inspector) **No.(क्र.):** POBN75897
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

# General Diary Details
## ठाणे दैनंदिनी तपशील

**State (राज्य):** महाराष्ट्र **District (जिल्हा):** वाशिम

**P.S. (पोलीस ठाणे):** आनसिंग

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.):** 003
2. **G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ):** 03/02/2023 02:50 वाजता
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार):** इतर
4. **Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी )):** SHIVAJIHanumantraoMASKE /सहाय्यक पोलीस उप-
5. **Case Type (प्रकरणाचा प्रकार) :**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**
   यावेळी नोंद आहे कि अप नं. 26/2023 कलम 7,12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 या गुन्हयाची संपुर्ण नोंद सी सी टि एन एस मध्ये झाल्या नंतर एफ आयआर सादर करित असतांना एफ आय आर सादर न होता आरोपी च्या कॉलम मध्ये त्रुटी दर्शवित असल्याने आरोपी चे कॉलम मधील कॉलम क्रमांक 2 मधील आरोपी तुळशीराम काशिराम लोखंडे रा. सुकळी यामध्ये दुरुस्ती करित असतांना एफ आय आर नजर चुकिने सादर झाल्याने सदर एफआय आर मध्ये आरोपी क्रमाक 2 यांचे नाव समाविष्ट झाले नसल्याने एफआय आर ची प्रींट काढुन दाखल करता अधिकारी यांचे हस्ताकशषरात आरोपी क्रमांक 2 तुळशीराम काशिराम लोखंडे रा. सुकळी हे समाविष्ट करण्यात आली आहे करिता नोंद.
7. **G.D. Subject (ठा. दै. चा विषय):**
   आरोपी नामे तुळशीराम काशिराम लोखंडे रा. सुकळी यांचे नाव अप नं.. 26/2023 मध्ये समाविष्ट केले बाबत नों
8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन,अनसिंग

**Report Printed on**
**(अहवाल मुद्रित केलेला दिनांक):** 03/02/2023

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**
**Name (नाव):** Prashant Janrao Kaware
**Rank (पद):** I (Inspector)

**Signature of G.D. Entry By (ठा. दै. नोंद करणाऱ्याची सही):**

**Name (नाव):** Prashant Janrao Kaware
**Rank (पद):** I (Inspector)
**No.(क्र.):**